८१

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना
शासकीय रुग्णालयांची श्रेणी व प्रोसिजर्सचे
दर निश्चिती-

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. रागांयो- २०१२/प्र.क्र.१३६ /आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई - ३२ ,
दिनांक :- १५ जून, २०१२

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र राज्यातील दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील कुटुंबासाठी विमा कंपनीच्या सहभागाने नविन जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी निवड केलेल्या विमा कंपनी व राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी यांच्याकडून रुग्णालये योजनेमध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. सदर योजनेमधील शासकीय रुग्णालयांना योजनेमध्ये समाविष्ट करताना त्यांची श्रेणी निश्चिती व श्रेणी निश्चिती प्रमाणे त्यांना लागू करावयाचे प्रोसिजर्सचे दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करावयाच्या शासकीय रुग्णालयांची श्रेणी व त्यानुसार प्रोसिजर्सचे दर खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

| श्रेणी | शासकीय रुग्णालयांना लागू करावयाच्या दरांची टक्केवारी |
|---|---|
| अ/ अ+ | १००% |
| ब | ९५ % |
| क | ९० % |
| ड | ८५ % |

२. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमधील शासकीय रुग्णालयांकरीता आरक्षित असलेल्या सोबतच्या परिशिष्टातील १३१ मेडिकल व सर्जीकल प्रोसिजर्समध्ये १०० % दर अनुज्ञेय राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( अ.सं.फडतरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, आरोग्य भवन, मुंबई
सर्व शासकीय रुग्णालयांचे अधिष्ठाता/ जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक
निवड नस्ती.